# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०४/२०२६ (सोमवार )

## खुन करणाऱ्या आरोपींना तात्काळ केले अटक
## रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— सदर गुन्हा पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत सलीम विट भट्टा, चौघान ,ता रामटेक येथे घडला आहे. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादी समीर महेश नैताम , वय १८ वर्षे आणि **मृतक समीर राजु नैताम, वय १८ वर्षे दोन्ही रा. ढाबाडीह जि. बलोदा बाजार राज्य छत्तीसगढ, ह.मु. सलीम खान विट भटटा ,चौघान ,ता. रामटेक जि नागपुर** हे दोघे दिनांक २६/०३/२०२६ रोजी गडमंदीर रामटेक येथे फिरायला गेले होते. तेथे यातील मृतक याने आरोपी क. १ उमेश निषाद, वय १९ वर्षे, रा. सलीम खान विट भटटा ,चौघान ,ता. रामटेक जि नागपुर याची चप्पल चुकुन घातली होती तेव्हा आरोपी कं १ त्याला चोर बोलला होता. त्यामुळे दिनांक ०५/०४/२०२६ रोजी रात्री २०/३० ते २१/०० वा.यातील फिर्यादी व मृतक हे आरोपी क. १ याला विचारणा करायला गेले होते. मृतक याने आरोपी क. १ याला विचारले कि, तु मला चोर का म्हटले यावरून **आरोपी क. १ उमेश निषाद, वय १९ वर्षे, २. गणेश निषाद, वय ३७ वर्षे, दोघे रा. सलीम खान विट भटटा ,चौघान ,ता. रामटेक जि नागपुर आरोपी कं ३. सुनिल निषाद, वय २९ वर्षे, आणि आरोपी कं ४. ईतवारी निषाद, वय ३५ वर्षे, दोघे रा. ताला जि बिलासपुर** यांनी मृतक याला लाठी, दांडयाने मारहाण करून गंभीर जख्मी केले आणि फिर्यादीचे डोक्यावर मारहाण करून जख्मी करून जिवाणे मारण्याचा प्रयत्न केला. यातील मृतक नामे समीर राजु नैताम याला उपचाराकामी दावाखान्यात दाखल केले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्याल मृत घोषीत केले.सदर प्रकरणात कलम १०३ (१),१०९(१),३५२,३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा केल्यानंतर नमुद आरोपी हा घटनास्थळावरून पळुन गेले होते.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनात रामटेक पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे जलद गतीने तपास करीत सदर गुन्हयातील चारही आरोपींना अवघ्या २ तासात मरारवाडी, ता. रामटेक येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपींना दिनांक ०६/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीचा दिनांक ०९/०४/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

## केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन केळवद हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **१) सुमेज रामदास सोमकुवर, वय ५० वर्ष, रा. ढालगावखैरी आणि २) प्रविण चुडामण वाघ ,४५ वर्षे, रा केळवद आणि आरोपी क्रं ३) , निर्मला पतीराम भलावी, वय ६० वर्षे, रा जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **१) सुमेज रामदास सोमकुवर, वय ५० वर्ष, रा. ढालगावखैरी आणि २) प्रविण चुडामण वाघ ,४५ वर्षे, रा केळवद आणि आरोपी क्रं ३) , निर्मला पतीराम भलावी, वय ६० वर्षे, रा जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर** यांचेवर **अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले

आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव केळवद पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **१) सुमेज रामदास सोमकुवर, वय ५० वर्ष, रा. ढालगावखैरी आणि २) प्रविण चुडामण वाघ ,४५ वर्षे, रा केळवद आणि आरोपी क्रं ३) निर्मला पतीराम भलावी, वय ६० वर्षे, रा जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर यांना २ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी सुमेज रामदास सोमकुवर**



**हद्दपार आरोपी प्रविण चुडामण वाघ**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,पोलीस स्टेशन उमरेड यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेडः—** दिनांक ०५/०४/२०२६ रोजी उमरेड पोलीस पोस्टे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, मौजा देवरी येथे राहणारा आरोपी वैभव चंद्रभान कांबळे हा अवैधरीत्या देशी दारू बाळगुन दारूची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या **आरोपी वैभव चंद्रभान कांबळे, रा. देवरी उमरेड** याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष घरझडती घेतली असता नमुद आरोपीचे ताब्यात देशी दारू मिळुन आली. पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या २० निपा किंमती १०००/—रुपये असा एकुण १०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी **वैभव चंद्रभान कांबळे, रा. देवरी उमरेड** यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने